**ठळक बातम्या**

- देशात एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरवठा सामान्य, व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठाही ७० टक्क्यापर्यंत पोहोचल्याचं पेट्रोलियम मंत्रालयाचं स्पष्टीकरण

- पश्चिम आशियातल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना एकजुटीनं सामोरं जाण्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बातमधून आवाहन

- राज्यात अनेक ठिकाणी वादळी पावसाची शक्यता / हवामान विभागाकडून १३ जिल्ह्यांना ऑरेंज, तर १४ जिल्ह्यांना यलो अलर्ट

- उद्योगपती विजयपत सिंघानिया यांच्या पार्थिवावर मुंबईत अंत्यसंस्कार

**आणि**

- आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईत मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स आमने-सामने

**<><><><><>**

देशात एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत असून रोज ५५ लाख सिलिंडरचं वितरण केलं जातं आहे, तसंच व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठाही सामान्य परिस्थितीत होता त्याच्या ७० टक्क्यापर्यंत पोहोचल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं सांगितलं.

देशभरातल्या सर्व पेट्रोल पम्पांवर पेट्रोल आणि डिझेलचाही पुरेसा साठा उपलब्ध असल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर या भागातले सर्व भारतीय खलाशी सुरक्षित असल्याचं बंदरे आणि जहाजबांधणी मंत्रालयानं म्हटलं आहे. १८ भारतीय जहाजं आखाती देशात सध्या कार्यरत असून ९०० खलाशी आतापर्यंत मायदेशी परतले आहेत. त्याचप्रमाणे ९४ हजार मेट्रिक टनाचा माल वाहून नेणारी दोन एलपीजी वाहक जहाजं भारताच्या दिशेनं निघाल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धस्थितीमुळे निर्माण झालेल्या आव्हानांना एकजुटीनं सामोरं जाण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात मधून केलं. आकाशवाणीवरच्या या कार्यक्रमाचा आज १३२ वा भाग होता. भारत, गेल्या दशकात निर्माण केलेलं सामर्थ्य आणि जागतिक संबंधांच्या जोरावर या आव्हानाचा खंबीरपणे सामना करत असल्याचं त्यांनी सांगितलं. ....

**- - होल्ड बाईट - YUDDHA PETROL SANKAT - - -**

जनतेनं अफवांना बळी पडू नये आणि सरकारकडून मिळणाऱ्या अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असं त्यांनी सांगितलं. हा विषय १४० कोटी भारतीयांच्या हिताचा असल्यानं त्यात राजकारण करू नये असं ते म्हणाले. अफवा पसरवणारे लोक देशाचं नुकसान करत आहेत असं मोदी म्हणाले.

युवाशक्तीला अर्थसंकल्पाची प्रक्रिया आणि धोरणनिर्मितीशी जोडण्यासाठी ‘माय भारत’ संघटनेच्या वतीनं अर्थसंकल्पावर आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषेत देशभरातल्या १२ लाख युवा प्रतिनिधींनी सहभाग घेतल्याची माहिती त्यांनी दिली. या उपक्रमाअंतर्गत निवडलेल्या निबंधांमधून युवा वर्गानं राष्ट्रहिताचे अनेक मुद्दे मांडल्याचं त्यांनी सांगितलं.

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतला भारताचा विजय तसंच जम्मू काश्मीरनं प्रथमच रणजी चषक जिंकल्याचा उल्लेख करुन प्रधानमंत्र्यांनी क्रीडा क्षेत्रातल्या प्रगतीचा आढावा घेतला. पूर्वी फार लोकप्रिय नसलेल्या खेळांनाही आता युवा वर्गाची पसंती मिळत असल्याचं पाहून, तसंच देशाची स्त्रीशक्ती क्रीडा क्रांतीत बजावत असलेली भूमिका पाहून आनंद वाटत असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली. शिक्षण क्षेत्रातल्या अभिनव प्रयत्नांची माहितीही त्यांनी आजच्या भागात दिली.

आंतरराष्ट्रीय योग दिनाला शंभर पेक्षा कमी दिवस उरले असल्याचं सांगून, त्यांनी श्रोत्यांना आरोग्यवर्धनाबाबत माहिती दिली.

मच्छिमार बांधव हे समुद्रावरचे योद्धे आणि आत्मनिर्भर भारताचा सशक्त पाया असून, त्यांच्या जीवनसुलभतेसाठी बंदरांचा विकास, विमा कवच आणि तंत्रज्ञानाचं सहाय्य, असे अनेक उपक्रम राबवले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. मत्सोद्योग क्षेत्रातल्या देशभरातल्या विविध नवोन्मेषी उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर देशभरात जलसंरक्षणासाठी होत असलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करून, जलसंवर्धनाचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं. जल संरक्षणाचा आपला निर्धार व्यक्त करण्याचा हा काळ असल्याचं ते म्हणाले. अमृत सरोवर अभियानाअंतर्गत देशभरात सुमारे ७० हजार अमृत सरोवरांची निर्मिती केली असून, पावसाळ्याआधीच त्यांच्या स्वच्छतेचं काम सुरु झाल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

राज्यात सर्वत्र येत्या २ दिवसात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडेल तसंच सोसाट्याचे वारे वाहतील. काही टिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे.

मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलका पाऊस होईल. जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, लातूर, आणि धाराशिव, या जिल्ह्यांना हवामान विभागाने वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे.

यवतमाळ, वर्धा, नागपूर, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, नांदेड, हिंगोली, कोल्हापूर, नंदुरबार, धुळे, सिंधुदुर्ग, आणि रायगड या जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे.

**<><><><><>**

महिला लैंगिक शोषण प्रकरणी अटकेत असलेला भोंदू बाबा अशोक खरात, याची पोलीस कोठडी नाशिकच्या न्यायालयानं आज ३ दिवसांनी वाढवली. खरात याच्या विरोधात आणखी दोन महिलांनी तक्रार केली असून, तो चौकशीत सहकार्य करत नसल्यामुळे, त्याची पोलीस कोठडी वाढवून मिळावी, अशी मागणी सरकारी वकिलांनी केली. त्यावर न्यायालयानं हा निर्णय दिला.

**<><><><><>**

प्रसिद्ध उद्योगपती आणि रेमंड उद्योगसमूहाचे माजी प्रमुख विजयपत सिंघानिया यांच्या पार्थिवावर आज मुंबईत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. रेमंड या कपड्यांच्या जगप्रसिद्ध ब्रँड बरोबरच पोलाद, सिमेंट, आणि कृत्रिम वस्त्रांच्या उद्योगात सिंघानिया यांनी वेगळं स्थान निर्माण केलं होतं.

कारखानदारीबरोबरच वैमानिक म्हणूनही त्यांनी नाव कमावलं होतं. लंडन ते नवी दिल्ली हा प्रवास मायक्रोलाईट विमानातून २३ दिवसात एकट्यानं करण्याचा विक्रम त्यांनी नोंदवला होता. तसंच वयाच्या ६७व्या वर्षी गरम हवेच्या बलूनमधून उड्डाण करण्याचा प्रयोग यशस्वी केला होता. हवाई दलानं त्यांना मानद एअर कमोडोर पद दिलं होतं, तर केंद्र सरकारनं पद्मभूषण सन्मान प्रदान केला होता. २००६ मधे ते मुंबईचे नगरपाल होते. अहमदाबादच्या भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या संचालक मंडळावरही त्यांनी काम केलं होतं.

सिंघानिया यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि इतर मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत आज मुंबईत वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना होणार आहे. दोन्ही संघांचा हा सलामीचा सामना असेल. थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

नाशिक इथं झालेल्या २२ व्या राष्ट्रीय दोरी उडी स्पर्धेत महाराष्ट्रानं सर्वसाधारण विजेतेपदासह डेमो प्रकारातही विजेतेपद मिळवत दुहेरी मुकुट पटकावला. महाराष्ट्रानं ६४ गुणांसह स्पर्धेचं सर्वसाधारण विजेतेपद आपल्या नावे केलं. दिल्लीनं ४८ गुणांसह दुसरं तर, हरयाणानं २९ गुणांसह तिसरं स्थान पटकावलं.

डेमो या सांघिक प्रकारातही महाराष्ट्राच्या खेळाडूंनी चांगला समन्वय दाखवत २७ गुणांसह सुवर्णपदक पटकावलं. डेमो प्रकारातही दिल्लीनं दुसरं, तर मध्य प्रदेशानं तिसरं स्थान मिळवलं.

**<><><><><>**

६९ व्या अखिल भारतीय पोलीस ड्युटी मीटचं उदघाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते नागपूर इथं झालं. देशाच्या विकासात आणि अंतर्गत सुरक्षेत पोलीस दलाचं योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. देशातल्या पोलीस

दलांचा इतिहास अत्यंत गौरवशाली राहिलेला असून भविष्यातही ते देशाच्या सुरक्षा आणि विकासात महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

पोलीस ड्युटी मीट  हा विविध राज्यांनी विकसित केलेल्या क्षमतांचं आदान प्रदान करण्यासाठी महत्त्वाचा मंच आहे. हा उपक्रम- 3 एप्रिलपर्यंत चालणार आहे.

**<><><><><>**

धुळ्यात जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी, ढिसाळ नियोजन आणि  सिलिंडर वाटपाला विलंब, याबद्दल ओम गॅस एजन्सीच्या संचालकांना कारणं दाखवा नोटीस पाठवली आहे. सिलेंडरची नोंदणी केल्यानंतर विहित कालावधीत संबंधित एजन्सीकडून पुरवठा होत नसल्याच्या ग्राहकांच्या अनेक तक्रारी आल्या होत्या. त्या आधारे जिल्हा पुरवठा अधिकारी संजय बागडे यांच्यासह पथकानं पाहणी केली.

**<><><><><>**

२१ वं आंबेडकरवादी साहित्य संमेलन ९ मे ला नांदेड इथं आयोजित करण्यात आलं आहे. सत्यशोधक विचार मंच आणि नांदेड-वाघाळा महानगरपालिका कर्मचारी युनियन यांनी संयुक्तरीत्या या संमेलनाचं आयोजन केलं आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी पत्रकार संजय आवटे असतील तर अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरख लोखंडे उद्घाटक असतील.
या संमेलनात कवी संमेलन, मुलाखती, पुरस्कारांचं वितरण, चर्चासत्र आदी कार्यक्रम असतील.

**<><><><><>**

सरकारी जागेवरचं अतिक्रमण नियमबद्ध करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे १५ लाख कुटुंबांना लाभ मिळेल असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यानी सांगितलं. ते आज नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते.

**//<><><><><>//**